**सं. फौ. ख. क्र.१०००/२०१८**

सरकार वि. विक्रम भाग्यवंत व इतर.

**नि.क्र.४०**

**अभियोग पक्षातर्फे साक्षीदार क्र.१ यांची जबानी**

मी शपथेवर कथन करतो की,

**माझे नाव– प्रकाश गुलाबराव माने**

वय–५० वर्षे, व्यवसाय–सहाय्यक पोलीस उपनिरीक्षक,

रा. इंदापूर, ता.इंदापूर, जि.पुणे.

**सरतपासणी अभियोगपक्षातर्फे सहाय्यक सरकारी अभियोक्ता श्रीमती एन. पी. कुचेकर, यांचेमार्फत शपथेवर सुरु –**

दि.२०/०६/२०१७ रोजी मी वालचंदनगर पोलीस स्टेशन येथे पो. ना. म्हणून नेमणूकीला होतो. त्या दिवशी सकाळी ०९.३० वाजता सहाय्यक पोलीस निरीक्षक भजनावळे व पो.नि.यादव यांची टीम व आमच्या पोलीस स्टेशनची टीम असे पोलीस स्टेशनला होतो. त्यावेळी भजनावळे यांना गुप्त बातमीदारामार्फत बातमी मिळाली की, बारामती इंदापूर रोडवरील सणसर येथे हॉटेल जगदंबा परमिट रूम हे शासनाने सिल केले आहे. तेथे दारू टाकण्यासाठी टेम्पो येणार आहे. त्यानंतर आम्ही दोन्ही टीम शासकीय वाहनाने त्या ठिकाणी गेलो. त्या ठिकाणी एक ४०७ मॉडेलचा टेम्पो हॉटेलसमोर उभा होता. त्या ठिकाणी तीन इसम थांबलेले होते. त्यापैकी दोघेजण टेम्पोतील माल खाली उतरवीत होते. त्या ठिकाणी तीनही हजर इसमांना ताब्यात घेतले. तेथील दारू पुन्हा टेम्पोत भरली व ती सिल करून पोलीस स्टेशनला आणला. जप्त मालाचा पोलीस स्टेशनमध्ये स. पो. नि. भजनावळे यांनी पंचनामा केला. आमचेसोबत त्यावेळी पंच होते. जगदंबा हॉटेल मालकाकडे दारू विक्रीचा परवाना नव्हता. आरोपीकडून एकूण देशी व विदेशी असे एकूण १९,६३,६९४/– चा टेम्पोसहीत मुद्देमाल जप्त केला. त्यानंतर मी पोलीस स्टेशनला जावून फिर्याद दाखल केली. आता मला मी दिलेली फिर्याद दाखविली. त्यातील मजकूर बरोबर आहे. **फिर्यादीस नि.क्र.४१** देण्यात येते. आरोपीपैकी आरोपी क्र.१ हजर आहे.

सरतपास पुर्ण.

**<u>उलटतपास आरोपी क्र.१ तर्फे श्री.एम.एस.चौधरी, विधीज्ञ यांचेमार्फत –</u>**

२. मी २०१७ ते २०२१ वालचंदनगर पोलीस स्टेशन येथे कर्तव्यावर होतो. बारामती इंदापूर पालखी रस्त्यावर हॉटेल जगदंबा आहे. हॉटेलच्या शेजारी परमीट रूम व इतर दुकाने आहेत. तो परिसर गजबजलेला आहे. त्या काळात त्या रस्त्यावरून पालखी येणार होती. रस्त्यावर पालखीमुळे खुप गर्दी होती. हॉटेल शेजारी पुर्वेला व पश्चिमेला राहती घरे आहेत. टेम्पो हा रस्त्याच्या कडेला उभा होता. आम्ही घटनास्थळावर उरतविलेल्या दारूचा व खोलीचा पंचनामा केलेला नाही. आरोपी क्र.१ कडे परवाना आहे का कसे मला माहिती नाही. मी परवान्याची विचारणा केली नाही. हॉटेल हे रोडच्या आत हजार फुटावर नाही. हे म्हणणे खरे नाही की, आरोपीने कोणताही दारूचा माल उतरविला नव्हता. आम्ही सर्वजण दारू व टेम्पो घेवून पोलीस स्टेशनला आलो. पोलीस स्टेशनमध्ये घटनास्थळावर उतरविलेला माल व गाडीत असलेला माल याचे वेगवेगळे पंचनामे केलेले नाहीत. आम्ही वेगवेगळे दारूचे सॅम्पल घेतले नाहीत. टेम्पोमध्ये परवान्याची दारू होती का कसे मला सांगता येणार नाही. टेम्पो चालकाला दारू उतरविण्यासाठी ट्रान्सफर परमिट दिले जाते का कसे मला सांगता येणार नाही. मी आरोपींचेकडे चौकशी केली नाही. हे म्हणणे खरे नाही की, आरोपी कधीही विना परवाना दारू विक्री करीत नव्हते. आरोपींना संपूर्ण मुद्देमाल परत केला आहे का कसे मला माहिती नाही. हे म्हणणे खरे नाही की, आरोपींनी कधीही जगदंबा हॉटेलसमोर कोणताही दारूचा मुद्देमाल उतरविला नाही. हे म्हणणे खरे नाही की, आरोपी हे बेकायदेशीर दारूचा व्यवहार करत नाही. हे म्हणणे खरे नाही की, इतर हॉटेल व्यावसायीकांच्या सांगण्यावरून खोटी केस केली आहे. हे म्हणणे खरे नाही की, आज रोजी खोटी साक्ष देत आहे.

**<u>उलटतपास आरोपी क्र.२ व ३ तर्फे श्री.भाग्यवंत, विधीज्ञ यांचेमार्फत –</u>**

३. दि.२०/०६/२०१७ या काळामध्ये बारामतीवरून इंदापूरला तुकाराम महाराजाची पालखी येत होती. पालखीच्या पुढे दिंडया असतात. कथीत घटनास्थळावरील रस्ता हा रहदारीचा आहे. घटनास्थळाच्या आजूबाजूला इतर परमिट रूम आहेत का कसे मला सांगता येणार नाही. हे म्हणणे खरे नाही की, जगदंबा हॉटेलमध्ये कधीही दारूचा मुद्देमाल आला नव्हता. हे म्हणणे खरे नाही की, आरोपी क्र.२ व ३ यांनी कधीही जगदंबा

हॉटेलमध्ये दारूचा मुद्देमाल उतरविला नाही. हे म्हणणे खरे नाही की, आरोपींच्याकडे वैध परवाना होता. हे म्हणणे खरे नाही की, इतर हॉटेल चालकांच्या सांगण्यावरून आरोपीच्याविरुध्द खोटी केस केली आहे.

उलटतपास पुर्ण.
फेरतपास नाही.

श्रवणोत्तर स्वीकृत,

सही/-
**( ए. बी. पाटील)**
न्यायदंडाधिकारी प्रथमवर्ग,
इंदापूर, ता.इंदापूर, जि.पुणे.

**दि.२९/११/२०२५**